**(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद )**

**मुंबई उच्च न्यायालय ,**

**फौजदारी अपिलीय न्यायशाखा**

**फौजदारी रिट याचिका क्रमांक.१८३५/२०२१**

श्री सुयोग गजानन औंधकर

वय- सुमारे ३० वर्ष , व्यवसाय:- शेती, ...... याचिकाकर्ता

रहिवासी :- कासेगाव, तालुका -वाळवा , जिल्हा -सांगली

- विरुद्ध -

१) महाराष्ट्र राज्य

गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव,

मंत्रालय, मुंबई यांच्या माध्यमातून

२) विभागीय आयुक्त, पुणे क्षेत्र, पुणे.

३) उपविभागीय अधिकारी, वाळवा, इस्लामपूर विभाग. ...उत्तरवादी

४) उपविभागीय पोलीस अधिकारी, इस्लामपूर विभाग,

इस्लामपूर, सांगली

५) सहाय्यक पोलीस निरीक्षक

कासेगाव पोलिस स्टेशन

तालुका -वाळवा , जिल्हा -सांगली

याचिकाकर्त्यासाठी :-सुश्री. ए.एस.गायकवाड यांच्या निर्देशाखाली श्री उज्जवल अगंदसूर्वे , उत्तरवादी -राज्यासाठी:- श्री.के.वि.सस्ते एपीपी

**न्यायनिर्णय राखीव ठेवण्याचा दिनांक:- जुलै २३,२०२१**

**न्यायनिर्णयघोषित करण्याचा दिनांक:- जुलै २७,२०२१**

**न्यायनिर्णय ( न्यायमूर्ती एस.एस.शिंदे द्वारे)**

१. न्यादेश . पक्षकारांची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलांच्या संमतीने न्यादेशावर त्वरित उत्तर मागविण्यात आले आणि शेवटी सुनावणी झाली.

२. याचिकाकर्त्याचे प्रकरण आहे की दिनांक १५ मार्च २०१९ रोजी इस्लामपूरच्या इस्लामपूर पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षकांनी पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सांगली/ विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवला आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ११० च्या तरतुदी लागू करून याचिकाकर्त्याविरुद्ध कारवाई करण्याची विनंती केली.

३. दिनांक २१ ऑगस्ट २०१९ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५६ (१) (अ) अंतर्गत याचिकाकर्त्याविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली . त्यानंतर, याचिकाकर्त्याने त्याला दिनांक २ नोव्हेंबर २०१९ रोजी जारी केलेल्या नोटीसला उत्तर दिले. त्यानंतर, दिनांक २५ डिसेंबर २०२० रोजी, इस्लामपूरच्या वाळवा प्रदेशातील उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी आदेश पारित केला आणि याचिकाकर्त्याला सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यांच्या महसुली सीमांमधून तडीपार केले. या आदेशामुळे व्यथित झालेल्या सध्याच्या याचिकाकर्त्याने विभागीय आयुक्त (महसूल), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील दाखल केली. या अपीलाला अंशतः परवानगी देण्यात आली, ज्यामुळे इस्लामपूरच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशात सुधारणा करण्यात आली, ज्यांनी याचिकाकर्त्याला सांगली जिल्ह्यातून तडीपार केले आणि सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर या शहरांमध्ये एका वर्षासाठी प्रवेश न करण्यास सांगितले.

४. वरील दोन्ही आदेशांमुळे व्यथित होऊन ही रिट याचिका दाखल करण्यात आली आहे.

५. याचिकाकर्त्याच्या वतीने हजर असलेल्या विद्वान वकिलाने सांगितले की कारणे दाखवा नोटीसमध्ये संबंधित प्राधिकरणाने नोंदवलेल्या साक्षीदारांच्या इन-कॅमेरा विधानांचा उल्लेख नाही. आक्षेपित आदेश पारित करताना कारणे दाखवा नोटीसमध्ये पाच गुन्ह्यांचा उल्लेख असला तरी सहा गुन्ह्यांवर भर दिला जातो. उत्तरवादींनी सुरू केलेली कारवाई असदभावी आहे आणि म्हणूनच ही याचिका मंजूर होण्यास पात्र आहे.

६. दुसरीकडे, उत्तरवादी-राज्य आणि त्याच्या अधिकाऱ्यांची बाजू मांडणाऱ्या विद्वान एपीपीने दोन्ही प्राधिकरणांनी नोंदवलेल्या कारणांवर आणि उक्त प्राधिकरणासमोर उत्तरवादींनी दाखल केलेल्या उत्तरावर अवलंबून राहून याचिका फेटाळली जाऊ शकते, असे

सादर केले.

७. इस्लामपूरच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी पारित केलेल्या आदेशाचे आम्ही अवलोकन केले आहे . या आदेशानुसार याचिकाकर्त्याला सांगली जिल्ह्याच्या महसुली सीमेवरून आणि सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर शहरांमधून २ वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे. सदर प्राधिकरणाने दिलेल्या कारणांचा आम्ही काळजीपूर्वक अवलोकन केले आहे आणि आम्हाला आढळले आहे की याचिकाकर्त्याने सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर शहरांमध्ये प्रवेश का करू नये यासाठी प्राधिकरणाने दिलेली कोणतीही ठोस कारणे नाहीत. निःसंशयपणे, खात्रीलायक आणि ठोस कारणे देऊन प्राधिकरण, प्रस्तावित तडीपार व्यक्तीला शेजारच्या जिल्ह्यांमधून तडीपार करू शकते, तथापि, सध्याच्या प्रकरणातील तथ्यांमध्ये, याचिकाकर्त्याला सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर शहरांमध्ये प्रवेश करण्याची परवानगी का दिली जाऊ नये यासाठी कोणतीही ठोस आणि खात्रीलायक कारणे दिली गेली नाहीत. अपील प्राधिकरणाने तडीपारी कालावधी २ वर्षांवरून एक वर्षापर्यंत कमी केला आहे, तथापि, वाहतूक सुविधेची उपलब्धता लक्षात घेता, याचिकाकर्ता सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर शहरांना भेट देऊ शकते आणि कथित बेकायदेशीर कारवायांमध्ये सहभागी होऊ शकते हे नमूद करण्याशिवाय ठोस कारणे दिली नाहीत. याचिकाकर्त्याला जारी केलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये, कॅमेऱ्यात साक्षीदारांची विधाने नोंदवल्याबद्दल कोणताही उल्लेख नाही. हे खरे आहे की कारणे दाखवा नोटीसमध्ये सर्व तपशील नमूद करणे आवश्यक नाही. तथापि, कारणे दाखवा नोटीसमध्ये सामान्य आरोपांचा मथितार्थ नमूद करणे आवश्यक आहे जेणेकरून प्रस्तावित तडीपार व्यक्तीला उक्त नोटीसचे उत्तर देता येईल.

८. उपविभागीय दंडाधिकारी, इस्लामपूर यांनी दिलेल्या कारणांचा काळजीपूर्वक अवलोकन केल्यावर असे म्हटले जाते की साक्षीदार त्यांना किंवा त्यांच्या मालमत्तेला भीती असल्याकारणाने याचिकाकर्त्याच्या विरोधात साक्ष देण्यासाठी पुढे येत नाहीत. कोणत्याही विशिष्ट साक्षीदाराच्या जबाबाचा कोणताही संदर्भ नाही. उत्तरवादी प्राधिकरणांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ (१) च्या तरतुदींचा अवलंब केला असल्याने, याचिकाकर्त्याच्या हालचाली किंवा कृती साक्षीदारांचे निवेदन कॅमेऱ्यात नोंदवून त्या व्यक्तीला किंवा मालमत्तेस भयभीत करत होत्या ,धोक्यात आणत होत्या किंवा हानी पोहोचवत होत्या, असा समाधानकारक निष्कर्ष नोंदवणे त्यांच्यासाठी आवश्यक होते. उक्त तरतुदीचा आदेश

असा आहे की तडिपारीचा आदेश पारित करताना, संबंधित प्राधिकरणाला व्यक्तिनिष्ठ समाधान किंवा मतावर पोहोचणे आवश्यक आहे की साक्षीदार त्यांच्या व्यक्तीच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षेसंदर्भात त्यांच्या बाजूने असलेल्या भीतीमुळे अशा व्यक्तीविरुद्ध सार्वजनिकरित्या पुरावा देण्यासाठी पुढे येऊ इच्छित नाहीत. प्रथम प्राधिकरणाने किंवा अपीलिय प्राधिकरणाने असा निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केलेला नाही . आधीच निरीक्षण केल्याप्रमाणे साक्षीदारांच्या “अ ” किंवा “ब ” जबाबाच्या इन-कॅमेरा रेकॉर्डिंगचा कोणताही संदर्भ नाही.

९. असे दिसते की याचिकाकर्त्याविरुद्ध दोन दिवसांच्या आत तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१०. पूर्वगामी परिच्छेदांमधील चर्चा लक्षात घेऊन, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५६ (१) (अ) च्या आदेशाचे पालन करण्यात उत्तरवादी पूर्णपणे अपयशी ठरले, असे आमचे मत आहे. याचिकाकर्त्याची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलाने योग्यरित्या सादर केल्याप्रमाणे, कारण दाखवा नोटीसमध्ये याचिकाकर्त्याविरुद्ध पाच गुन्हे नोंदवले आहेत, असे नमूद केले आहे, तथापि, आक्षेपित आदेशात सहा गुन्ह्यांचा उल्लेख आहे. दोन्ही प्राधिकरणांनी दिलेल्या कारणांचा काळजीपूर्वक अवलोकन केल्यावर, कारण दाखवा नोटीस आणि आक्षेपित आदेशात नमूद केलेल्या याचिकाकर्त्याविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्यांचा याचिकाकर्त्याविरुद्ध सुरू केलेल्या तडीपारी कार्यवाहीशी थेट संबंध असल्याचे आम्हाला आढळत नाही. त्यामुळे, आमचे असे मत आहे की याचिका मंजूर केली जावी.

११. या प्रकरणाच्या दृष्टीकोनातून, प्रार्थना खंड (ब ) च्या संदर्भात याचिका मंजूर आहे जी खालीलप्रमाणे आहे:

" (ब ) माननीय उच्च न्यायालयाला विनंती करण्यात येते की उत्प्रेषण लेख , उत्प्रेषण स्वरूप असलेले लेख आणि /किंवा उत्प्रेषण स्वरूप असलेले लेख जारी करून आणि संबंधित रेकॉर्ड बोलावून आणि दिनांक २४/१२/२०२० रोजी उत्तरवादी क्रमांक.३ ने पारित केलेल्या आक्षेपित आदेशातून उध्दभवणारी अपील क्रमांक.ई.ए.११/२०२१ मध्ये दिनांक ३१/०३/२०२१ रोजी आक्षेपित आदेशात उत्तरवादी क्रमांक.२ कमिशनर पुणे यांनी केलेली कार्यवाही कार्यालयातून बोलावून आणि कायदेशीरपणा, वैधता आणि औचित्य तपासल्यानंतर, उत्तरवादी क्रमांक.२

कमिशनर, पुणे यांनी दिनांक ३१/०३/२०२१ रोजी पारित केलेला आक्षेपित आदेश रद्दबातल करावा.”

१२. न्यादेश हा वरील मर्यादेपर्यंत कायम करण्यात येत आहे. रिट याचिका निकाली काढण्यात येते.

**( न्यायमूर्ती एन.जे जामदार)** **( न्यायमूर्ती एस.एस.शिंदे )**

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".